**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## सोमवार, दिनांक ८ मार्च, २०२१

**( सकाळी ११.०० वाजता )**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री :** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये सामान्य प्रशासन विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(२) उप मुख्यमंत्री :** विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये नियोजन विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उद्योग, मराठी भाषा मंत्री :** (क) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये मराठी भाषा विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१६-२०१७ ते २०२०-२०२१ या वर्षांचे अर्थविवरण पत्रक व कामाचा कार्यक्रम आणि सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या वर्षाचे सुधारीत अंदाज पत्रक सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचा अनुक्रमे चोपन्नावा व पंचावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचा सन २०१५-२०१६ व २०१६-२०१७ या वर्षांचा वार्षिक हिशेब सभागृहासमोर ठेवतील.

(४) **कामगार मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(५) **ऊर्जा मंत्री** : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा पंधरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(६) **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : **(क)** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २००९-२०१० ते २०१३-२०१४ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** मुंबई विद्यापीठ यांचे सन २०१४-२०१५ ते २०१८-२०१९ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(ङ)** कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक, नागपुर यांचे सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांचे २०१८-२०१९ या वर्षाचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह) सभागृहासमोर ठेवतील.

**(छ)** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, विष्णुपुरी नांदेड यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ज)** कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(झ)** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा पंधरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ट)** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(ठ)** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०१८-२०१९ या वर्षाचा बासष्ठावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(७) **कृषि मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(८) **मृद व जलसंधारण मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये मृद व जलसंधारण विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(९) **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

(१०) **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विकास मंडळनिहाय कार्यक्रमांतर्गत व अनिवार्य नियतव्यय व प्रत्यक्ष खर्चाचे (अविभाज्य भागासह) विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : शासकीय विधेयके :**

**(१) संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यासाठी निश्चित केलेला कालावधी वाढविण्यासंबंधी गृह मंत्र्यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२० चे वि.स.वि. क्रमांक ५१ — शक्ती फौजदारी कायदे (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२० यावर विचार करण्यासाठी दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी नियुक्त केलेल्या संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्याकरिता निश्चित केलेली मुदत विधानसभेच्या पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत वाढविण्यात यावी."

---

**(२) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(क) सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१.**

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुधीर मुनगंटीवार, ॲड राहुल कुल, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ विधेयक, २०२१ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५ — महाराष्ट्र राज्य कौशल्य

विद्यापीठ विधेयक, २०२१ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(शुक्रवार, दिनांक ५ मार्च, २०२१ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**चार : सर्वश्री देवेंद्र फडणवीस, चंद्रकांत (दादा) पाटील, सुधीर मुनगंटीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, ॲड.आशिष शेलार, डॉ.संजय कुटे, सर्वश्री रवि राणा, संभाजी पाटील-निलंगेकर, अतुल भातखळकर, राम कदम, गणेश नाईक, नितेश राणे, जयकुमार रावल, गिरीष महाजन, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री समीर कुणावार, बबनराव लोणीकर, सुनील राणे, हरीभाऊ बागडे, अभिमन्यु पवार, सचिन कल्याणशेट्टी, शिवेंद्रसिंह भोसले, श्रीमती मनिषा चौधरी, ॲड॰ पराग अळवणी, सर्वश्री मंगलप्रभात लोढा, रणधीर सावरकर, मोहन मते, संतोष दानवे, प्रशांत बंब, अमित साटम, सौ. मेघना साकोरे-बोर्डीकर, ॲड॰ राहुल कुल, सर्वश्री सिध्दार्थ शिरोळे, जयकुमार गोरे, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, हत्या, अपहरण, दरोडे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली वाढ, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, पुणे येथे पुजा चव्हाण आत्महत्या प्रकरणी संशयित मंत्र्यांचा राजीनामा घेतला असला तरी तो तीन दिवसांनंतरही राज्यपालांकडे पाठविलेला नसल्यामुळे जनतेच्या मनात निर्माण झालेला संभ्रम, या प्रकरणी २४ दिवसांचा कालावधी होऊनही गुन्हा दाखल झालेला नसून तपासाबाबत राज्यातील जनतेला अंधारात ठेवले असणे, पारदर्शक पध्दतीने तपास होण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेकडे तपास देण्याची आवश्यकता, ज्येष्ठ नागरिकांसंबंधीच्या गुन्ह्यात झालेली वाढ, डान्सबारला आळा घालण्यात आलेले अपयश, सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण, पोलिसांवर पडणारा ताण, पुणे, नागपूर, नाशिक या सारख्या शहरात संघटित गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफियांकडून, अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांकडून, शासकीय अधिकाऱ्यांवर होणारे हल्ले व जीवे मारण्याच्या धमक्या, कोरोना काळात पोलिसांवर झालेले हल्ले, सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्यांना मिळालेले मोकळे रान, सामाजिक अत्याचारात झालेली वाढ, महान कलाकारांची गुप्तहेरांमार्फत चौकशी करण्याचा सरकारने घेतलेला घृणास्पद निर्णय, गुंडाराजच होत असलेलं उदात्तीकरण, राज्यावर घातपाती कारवायांचे असलेले गंभीर सावट, जातीय हिंसाचारात झालेली वाढ, जातपंचायतीच्या अत्याचाराच्या समोर आलेल्या घटना, तसेच, मुंबईतील अनेक मोठ्या व

जनउपयोगी प्रकल्पांचे रखडलेले काम, वाहतुकीचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, मुंबई महानगरपालिकेतील भ्रष्टाचार व अनियमिततेची प्रकरणे, पुनर्विकास प्रकल्पांची रखडलेली कामे, मुंबईच्या विविध समस्यांनी धारण केलेले उग्र स्वरुप, मुंबईतील रखडलेली विकास कामे, महानगरपालिकेने गेल्या १० वर्षात केलेला खर्च, याबाबत श्वेतपत्रिका जाहीर करण्याची होत असलेली मागणी, मुंबईतील मेट्रोची कारशेड कांजूरमार्गलाच करण्याबाबत सरकारने धरलेला दुराग्रह त्यातून मेट्रोला होणारा विलंब व मुंबईकरांचे होणारे नुकसान, कोस्टल रोडच्या कामामुळे मच्छीमारांचे निर्माण झालेले प्रश्न, धारावी पुनर्विकासाचा प्रश्न मार्गी लावण्यात होत असलेला विलंब, उपकर प्राप्त इमारतींचा प्रश्न, देवनार डम्पिंग ग्राउंडचा प्रश्न, बीडीडी चाळींच्या पुनर्विकासातील समस्या यासारख्या मुंबईच्या समस्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, झोपडपट्टी पुनर्वसन, सेस इमारतींचा प्रश्न, पुनर्बांधणी, स्वयंपुनर्बांधणी, परवडणारी घरे, भाडयाची घरे, महाकाय प्रकल्पांमुळे विस्थापित झालेल्यांच्या समस्या, मास हाऊसिंग सारखे प्रश्न व त्याबाबतच्या उपाययोजनांमध्ये निर्माण झालेल्या समस्या, तसेच कोरोना प्रादुर्भाव व मृत्यूची संख्या देशपातळीवर महाराष्ट्रात सर्वाधिक, कोरोना उपाययोजनात झालेला भ्रष्टाचार, टाळेबंदीमुळे अडचणीत आलेल्यांना सरकारने पॅकेजेस देण्यात केलेली कुचराई, सत्तारुढ पक्षाच्या नेत्यांकडून कोरोना नियमांचे झालेले उल्लंघन, कोरोना हाताळण्यात सरकारला आलेले अपयश, तसेच राज्यातील विविध विभागांचा संतुलित विकास करण्यात व टाळेबंदी शिथिलीकरणानंतर या विभागांचे अर्थचक्र सुरळीत करण्यात सरकारला आलेले अपयश, राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, मराठा, धनगर, आर्थिकदृष्टया मागास यांच्यासाठीच्या योजना राबवण्यात, त्याचा लाभ देण्यात सरकारला आलेले अपयश, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

**(दुपारी २-०० वाजता)**

**पाच : उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री : सन २०२१-२०२२ चा अर्थसंकल्प सादर करतील.**

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : ६ मार्च, २०२१

**राजेन्द्र भागवत,**
सचिव,
महाराष्ट्र विधानसभा